# श्री शनैश्वर देवस्थान विश्वस्तव्यवस्था (शिंगणापूर)

**शिंगणापूर – ४१४१०५**

**तालुका – नेवासा, जिल्हा – अहिल्यानगर**

**दूरध्वनी क्रमांक** : (**०२४२७**) **२३८११०**, Website – www.shanidev.com

Email – shanishingnapur@yahoo.com

---

## सन - २०२६ ते २०२९ (३ वर्ष )

( **कालावधी माहे एप्रिल २०२६ ते माहे मार्च २०२९ अखेर** )

## श्री शनैश्वर संस्थानचे प्रसादालयामध्ये प्रसाद/भोजन स्वयंपाक तयार करून, भाविकांना वाढण्याचे व तत्सम कामे प्रति पात्र मजुरी दराने करणे करिता ई - निविदा.

**शनैश्वर देवस्थान विश्वस्तव्यवस्था (शिंगणापूर)**
**शिंगणापूर – ४१४१०५**
**तालुका – नेवासा , जिल्हा – अहिल्यानगर**
**दूरध्वनी क्रमांक** : (**०२४२७**) **२३८११०**, Website – www.shanidev.com
Email – shanishingnapur@yahoo.com

---

## जाहीर ई – निविदा नोटीस

श्री शनैश्वर संस्थानचे प्रसादालया मध्ये प्रसाद/भोजन स्वयंपाक तयार करून, भाविकांना वाढण्याचे व तत्सम इ. कामे प्रति पात्र मजुरी दराने करणे करिता ( कालावधी माहे एप्रिल २०२६ ते मार्च २०२९). इ. कामासाठी ऑनलाईन ई-निविदा मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र | कामाचा तपशील | ई-निविदा शुल्क रु. | बयाणा रक्कम रु. |
|---|---|---|---|
| १ | **श्री शनैश्वर संस्थानचे प्रसादालया मध्ये प्रसाद/भोजन स्वयंपाक तयार करून, भाविकांना वाढण्याचे व तत्सम इ. कामे प्रति पात्र मजुरी दराने करणे करिता ( कालावधी माहे एप्रिल २०२६ ते मार्च २०२९).** | ३०००/- | ५०,०००/- |

१. निविदे बाबत सविस्तर माहिती, अटी व शर्ती www.mahatenders.gov.in संस्थानचे www.shanidev.com या संकेतस्थळांवर उपलब्ध आहेत.
२. निविदा शुल्क व बयाना रक्कम शासनाचे www.mahatenders.gov.in या अधिकृत स्थळावर ऑनलाईन भरावी.
३. यशस्वी निविदाधारकास रु.२,००,०००/- ( दोन लाख रुपये ) इतकी रक्कम संस्थानकडे सुरक्षा अनामत म्हणून बिनव्याजी जमा करावी लागेल.
४. निविदा ऑनलाईन डाऊनलोडींग व अपलोडिंगसाठी दि.२४.०४.२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजेपासून ते दि.०६.०५.२०२६ दुपारी २.०० वाजेपर्यंत उपलब्ध राहील.
५. निविदा पूर्व बैठक: निविदेतील अटी-शर्ती बाबत संभाव्य निविदाधारक यांना प्रश्न असल्यास निविदा पूर्व बैठकीत आपले म्हणणे सादर करता येईल. देवस्थान तर्फे निविदा पूर्व बैठकीतील झालेले निर्णय www.shanidev.com या संकेतस्थळावर उपलब्ध असतील व सदरील निर्णय मूळ निविदेचा भाग समजण्यात येतील. निविदा पूर्व बैठक संस्थानचे प्रशासकीय कार्यालयात येथे दि.२८.०४.२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता आयोजित करणेत येईल.
६. ई –निविदेतील तांत्रिक कागदपत्राच्या तपशिला प्रमाणे सर्व वैध कागदपत्रे स्कॅन करून ऑनलाईन निविदे सोबत जोडावीत.
७. ई –निविदा प्रक्रियेमध्ये केवळ online सादर केलेल्या कागदपत्रांचा विचार करणेत येईल. तथापि यशस्वी निविदाधारकाने सदर वैध कागदपत्रांच्या मूळ प्रती ई –निविदेसह पुढील १५ दिवसाचे आत संस्थान प्रशासनाकडे सादर करणे अनिवार्य असेल.
८. तांत्रिक निविदा शक्य झाल्यास दि.०८.०५.२०२६ रोजी उघडण्यात येतील.
९. कोणतीही निविदा अंशत: /पूर्णपणे स्वीकारणे अथवा सर्व निविदा नाकारणेचा हक्क संस्थानने राखून ठेवलेला आहे.

**अतुल चोरमारे**
**कार्यकारी अधिकारी**
**श्री शनैश्वर देवस्थान शिंगणापूर तथा**
**विशेष भूसंपादन अधिकारी क्र.१, अहिल्यानगर**

## <u>निविदेच्या अटी व शर्ती</u>

<u>A) **निविदेचा तपशील**</u> - श्री शनैश्वर देवस्थान विश्वस्तव्यवस्था, शिंगणापूर प्रसादालय विभागामार्फत सन २०२६-२०२९ करीता (माहे एप्रिल २०२६ ते मार्च २०२९) प्रसादालयामध्ये प्रसाद/भोजन स्वयंपाक तयार करून, भाविकांना वाढण्याचे व तत्सम कामे प्रति पात्र मजुरी दराने करणे करिता इ. कामासाठी ई-निविदा.

१) कंत्राटाचा कालावधी - ३ वर्ष
२) प्रसादालयामध्ये संस्थानकडील उपलब्ध जागेत प्रसाद/भोजन स्वयंपाक तयार करून, भाविकांना वाढण्याचे व तत्सम कामे करून देणे.

<u>B) **कामाची व्याप्ती** (Scope of Work)-</u>

श्री शनैश्वर देवस्थान विश्वस्तव्यवस्था, शिंगणापूर, प्रसादालय विभागाकडून कंत्राटी मजुरी दराने करावयाच्या कामाची व्याप्ती खालीलप्रमाणे -

१) प्रसाद भोजन स्वयंपाक तयार करण्यासाठी लागणारा सर्व प्रकारचा किराणा साहित्य, धान्य व कडधान्य त्याच प्रमाणे सर्व प्रकारचा भाजीपाला यांचा पूरवठा देवस्थान करेल.

२) सध्यस्थिती मध्ये देवस्थानकडे उपलब्ध असलेली मशिनरी व साहित्य उपलब्ध करून देण्यात येईल.

३) प्रसादालयासाठी वेळोवेळी खरेदी केलेला सर्व प्रकारचा किराणा माल,धान्य,आटा व कडधान्ये त्याच प्रमाणे सर्व प्रकारचा भाजीपाला, स्वयंपाकासाठी लागणारे गॅस सिलेंडर इ.सर्व उतरून घेण्याची जबाबदारी निविदा धारकाची राहील. आवश्यक कच्चा माल प्रसादालय विभागामार्फत पुरविण्यात येईल. तथापि, सदर कच्च्या मालाची वाहतूक ठेकेदारास स्वतःच्या कामगारांद्वारे संस्थान वाहनाने संस्थानचे भांडारामधून करून घेणे आवश्यक राहील.

४) स्वयंपाकासाठी लागणारे तांदूळ गहू,डाळी,शेंगदाणे इ.किराणा माल, भाजीपाला व भाजीसाठी आणलेले इतर कडधान्ये निवडण्याची व त्यातील खडे काढून स्वच्छ करून घेण्याची तसेच गव्हाचे व इतर सर्व प्रकरचे पीठ चाळून घेण्याची संपूर्ण जबाबदारी निविदा धारकाची राहील.

५) त्याचप्रमाणे स्वयंपाक तयार करण्यासाठी लागणारी सर्व प्रकारची भांडी स्वयंपाक तयार करण्यापूर्वी स्वच्छ धुवून घेणे, स्वयंपाक तयार करणे, भाविकांना जेवण वाढणे, भाविकाचे जेवण झाल्यानंतर भोजनपात्र उचलून नेणे व ते स्वच्छ धुवून काढणे, भाविकांचे जेवण झाल्यानंतर किचन रूम मधील सर्व भांडी स्वच्छ धुवून काढणे. प्रत्येक जेवणाची पंगत संपल्यानंतर भोजनालायातील बैठकीच्या जागेची टेबलाची साफसफाई करणे इ. कामे व्यवस्थितरीत्या करणे. या प्रमाणे स्वच्छता न ठेवल्यास कारवाई करण्यात येईल.

६) देवस्थानचे प्रसादालय भोजनालयाची वेळ सकाळी १०.३० ते रात्री ०९.३० अशी राहील. या वेळेत प्रसादालय विभाग प्रमुख निश्चित करतील तो मेनू भाविकांच्या जेवणाकरिता ठरवून दिलेल्या वेळे अगोदर १५ मिनिटे व्यवस्थित रित्या करणे आवश्यक आहे. स्वयंपाकाच्या गुणवत्ता आणि प्रत बाबत भाविकाची तक्रार येऊ न देणे या बाबतची योग्य ती काळजी घेण्याची संपूर्ण जबाबदारी निविदा धारकाची राहील.

७) प्रसादालयाचे किचन रूम मधील तयार अन्नपदार्थाची व कच्चा मालाची व्यवस्थितरित्या झाकपाक करून ठेवणे. भाविकांना जेवताना पिण्यासाठी जागेवर स्वच्छ ग्लासने पाणी देणे बंधनकारक आहे. सदरील भोजन हे प्रसाद स्वरूपाचे असल्यामुळे अन्नाची नासाडी होणार नाही याची दक्षता घेण्याची जबाबदारी निविदा धारकाची असेल. अन्नाची नासाडी होत असल्याचे निदर्शनास आल्यास जेवढ्या पात्राची नासाडी होईल त्यानुसार नुकसान भरपाई म्हणून प्रती पात्र रु.५०/- या दराने मंजूर निविदाधारकाकडून रक्कम वसूल करण्यात येईल.

८) प्रसाद भोजन तयार करण्यासाठी अनुभवी आचारीची नेमणूक करणे तसेच प्रसादालयातील मेनू नुसार डाळ, भात,मसाला भात, चपाती,रवा(शिरा),सुकी भाजी, पातळ भाजी स्वयंपाक दैनंदिन खालील तपशिलाप्रमाणे तयार करून वाढणे या कामाची

जबाबदारी निविदा धारकाची राहील. मात्र सदरील मेनूमध्ये बदल झाल्यास त्या बदला प्रमाणे स्वयंपाक तयार करून वाढणे या कामाची जबाबदारी निविदा धारकाची राहील.

| अ.नं. | वार | मेनू |
|---|---|---|
| १ | सोमवार | चपाती, सुकी भाजी ,पातळ भाजी,रवा(शिरा) डाळ भात |
| २ | मंगळवार | चपाती, सुकी भाजी ,पातळ भाजी,रवा(शिरा) मसाला भात |
| ३ | बुधवार | चपाती, सुकी भाजी ,पातळ भाजी,रवा(शिरा) डाळ भात |
| ४ | गुरुवार | चपाती, सुकी भाजी ,पातळ भाजी,रवा(शिरा) मसाला भात |
| ५ | शुक्रवार | चपाती, सुकी भाजी ,पातळ भाजी,रवा(शिरा) डाळ भात |
| ६ | शनिवार | चपाती, सुकी भाजी ,पातळ भाजी,रवा(शिरा) मसाला भात |
| ७ | रविवार | चपाती, सुकी भाजी ,पातळ भाजी,रवा(शिरा) डाळ भात |

९) प्रसाद भोजन तयार करण्यासाठी व वाढप करण्यासाठी वापरण्यात येणारी उपकरणे/मशीन कंत्राटदारास स्वतः स्वखर्चाने आणणे बंधनकारक राहील. तूर्त देवस्थान कडे उपलब्ध मशीन व साहित्य उपयोगात येत असल्यास ते मोफत वापरण्यास देण्यात येईल. सदरील साहित्याची यादी परिशिष्ट "उ" मध्ये जोडली आहे. मात्र सदरील साहित्याची देखभाल दुरुस्ती खर्च पुरवठादार यांना करावयाचा आहे. प्रसादालयातील वापरासाठी दिलेल्या सर्व वस्तू निविदा  कालावधी पूर्ण झाल्यानंतर सुव्यवस्थित देवस्थानच्या ताब्यात देण्याची जबाबदारी मंजूर निविदा धारकाची राहील. वस्तूचे नुकसान झाल्यास नुकसान भरपाई म्हणून नवीन वस्तूच्या मुल्याएवढी नुकसान भरपाई मंजूर निविदा धारकाकडून बिलातून वसूल करण्यात येईल.

१०) गर्दीचे प्रमाणात प्रसाद भोजन पात्र मागणीप्रमाणे दररोज (दैनंदिन) सरासरी २००० व गर्दीचे काळात २५००-३००० हजारपर्यंत भाविकांसाठी जेवण पात्र तयार करून देणे आवश्यक राहील. वरील संख्या भाविक संख्येवर अवलंबून असून कमी-जास्त प्रमाणात मागणी नुसार पुरवठा करावा लागेल. सदरील बाबत भाविकांची संख्या कमी अथवा जास्त होऊ शकते, या बाबत निविदा भरताना विचार करण्यात यावा नंतर या बाबत कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

११) प्रसाद/भोजन विभागास आवश्यकता असेल त्याप्रमाणात आवश्यक तेवढ्या कर्मचाऱ्यांची नेमणूक करणे निविदा धारकावर बंधनकारक राहील.

१२) प्रसाद/भोजनालय इमारतीतील किचन रूम, स्टोअर, जेवण हॉल, कुपन रांग, पाणी पिण्याचे ठिकाण इ.ठिकाणी संपूर्ण साफसफाई करणे व  नियमित स्वच्छता ठेवण्याची जबाबदारी निविदा धारकाची राहील.

१३) प्रसाद/भोजनालय इमारतीतील किचन रूम, स्टोअर, जेवण हॉल, कुपन रांग, पाणी पिण्याचे ठिकाण इ.ठिकाणी (झुरळ, मुंगी, उंदीर) इतर किटक नियंत्रित फवारणी (पेस्ट कंट्रोल) प्रसाद/भोजनालय चालू करण्यापूर्वी तसेच ३ महिन्यातून एकदा व अवश्यकतेनुसार करण्याची जबाबदारी मंजूर निविदा धारकाची राहील.

१४) प्रसाद/भोजन बनविण्यासाठी वापरात येणारी गॅस संबधी सर्व उपकरणाची साहित्याची (गॅस कनेक्शन पाईप लाईन,गॅस शेगड्या,बर्नर इ.) गॅस लिकेज व सुरक्षा तपासणी मासिक नियमित सर्वीसिंग करणे तसेच इतर मशिनरी संबधी सर्व दुरुस्ती करण्याची जबाबदारी निविदा धारकाची राहील.

१५) श्री शनैश्वर देवस्थान संचलित वसतिगृह येथील विद्यार्थांसाठी तेथील स्वयंपाकगृहामध्ये चपाती बनविणे, भांडी धुणे या कामासाठी १ महिला कर्मचारी नेमावी लागेल, त्या बाबत माहिती घेऊन निविदा अर्ज भरावा.

C) **ई - निविदा सोबत सादर करावयाची कागदपत्रे, आर्थिक उलाढालीचे निकष वगैरे तपशील –**

१)अन्न औषध प्रशासन यांचा चालू वर्षाचा वैध केटरिंग,रेस्टॉरंट किंवा तत्सम परवान्याची प्रत ऑनलाईन सादर करणे अनिवार्य राहील.

२)शॉप ॲक्ट परवाना

३) फर्मच्या नावाने वैध लेबर लायसन्स, स्वतंत्र पी.एफ. कोड ड्राफ्ट लेटरची सत्यप्रत ऑनलाईन सादर करणे अनिवार्य राहील.

४) फर्मचा कर्मचारी विमा राज्य महामंडळ (Employee's State Insurance Corporation) यांचा ESIC कोड लेटरची सत्यप्रत ऑनलाईन सादर करणे अनिवार्य राहील.

५) GST नोंदणी दाखला ऑनलाईन सादर करणे अनिवार्य राहील.

६) पॅन कार्ड ऑनलाईन सादर करणे अनिवार्य राहील.

७) निविदा धारकाची संपूर्ण माहिती **परिशिष्ट - "ब" प्रमाणे**

८) श्री शनैश्वर देवस्थान विश्वस्तव्यवस्था (शिंगणापूर) यांना निविदा धारकाने द्यावयाचे बंधपत्र परिशिष्ट - "क" प्रमाणे

९) फर्मची सन २०२२-२३, २०२३-२०२४ व २०२४-२०२५ या ०३ आर्थिक वर्षात किमान वार्षिक सरासरी उलाढाल रक्कम रु.५० लाख मात्र असणे अनिवार्य राहील. तसे उलाढाल नमूद असणारे व निविदे सोबत दिलेल्या नमुन्याप्रमाणे सनदी लेखापाल (सी.ए.) यांचे प्रमाणपत्र UDIN नंबरसह सादर करणे अनिवार्य राहील. परिशिष्ट - "ड" प्रमाणे

१०) निविदा सादर करावयाची आहे, त्या फर्म / संस्थेला यापूर्वी कोणत्याही संस्था / शासकीय / निमशासकीय / खाजगी स्वायत्त संस्था यांनी काळ्या यादीत समाविष्ट केले नसल्याबाबत लेखी प्रतिज्ञापत्र ऑनलाईन सादर करणे अनिवार्य राहील.

११) अनुभव बाबत निविदाधारक यांनी मागील ५ वर्षात खालील प्रमाणे कोणतेही एक अनुभव असणे आवश्यक असेल

- एकूण निविदा रकमेच्या म्हणजेच ४० लक्ष च्या ८० टक्के म्हणजे ३२ लक्ष रु चे एक काम
- एकूण निविदा रकमेच्या म्हणजेच ४० लक्ष च्या ५० टक्के म्हणजे २० लक्ष रु चे दोन काम
- एकूण निविदा रकमेच्या म्हणजेच ४० लक्ष च्या ४० टक्के म्हणजे १६ लक्ष रु चे तीन काम

याबाबत कोणत्याही शासकीय/निमशासकीय/खाजगीसंस्था/देवस्थान/ट्रस्ट यांचे कडील संबधित संस्थेने/प्राधिकरणाने दिलेल्या कार्यादेश व काम समाधानकारक असले बाबतचे प्रमाणपत्र आवश्यक असेल.

खाजगी संस्था मधील अनुभव बाबत निविदा धारक यांनी परिशिष्ट "इ" मधील प्रमाण पत्र निविदा सोबत तांत्रिक लिफाफ्यात सादर करणे आवश्यक असेल.

**D) तांत्रिक यशस्वी निविदाधारकाची निवड -**

१) तांत्रिक दृष्ट्या पात्र ठरलेल्या निविदा धारकांनी अनुभवाची सादर केलेली कागदपत्रे बाबत तपासणी हि स्थळ पाहणी करून केली जाईल. सदरील तपासणी मध्ये पात्र ठरल्या नंतरच आर्थिक लिफाफा उघडण्याची पुढील कार्यवाही करण्यात येईल.त्या नंतरच

**E) कामाचा तपशील, निविदा कालावधी, निविदा शुल्क, बयाणा रक्कम**-

१) सदर निविदेचा वैधता कालावधी निविदेच्या अंतिम दिनांकापासून ६० दिवसांचा राहील.

२) प्रसाद/भोजन तयार करणे व वाढणे इ. कामांचा कालावधी कार्यादेश मिळाल्यापासून ०३ वर्षासाठी राहील.

३) निविदे सोबत नियमाप्रमाणे बयाना रक्कम रु.५०,०००/-(अक्षरी रुपये पन्नास हजार मात्र) व निविदा शुल्क रु.३,०००/-(अक्षरी रुपये तीन हजार मात्र )शासनाचे अधिकृत संकेतस्थळ www.mahatenders.gov.in वर जमा करून त्याची भरणा पावती सोबत ऑनलाईन जोडावी. निविदा शुल्कासाठी भरलेली रक्कम रु.३,०००/- परत केली जाणार नाही.

४) MSME अंतर्गत निविदा फी व बयाना रक्कम न भरण्याची सवलत या निविदेला लागू नाही. सर्व निविदाधारकांनी निविदा फी व बयाना रक्कम भरणे अनिवार्य आहे.

**F ) सुरक्षा अनामत रक्कम व करारनामा –**

१) यशस्वी निविदा धारकाला कामाची हमी म्हणून रु.२,००,०००/- ( दोन लाख रुपये ) इतकी सुरक्षा अनामत रक्कम निविदा स्वीकृतीचे पत्र मिळाल्यापासून ०१ महिन्याच्या आत संस्थान खाती किंवा डीडी स्वरूपात जमा करावी लागेल. सदर रक्कमेवर कोणत्याही प्रकारचे व्याज मिळणार नाही.

२) निविदा धारकाने संस्थानाकडे भरलेली सुरक्षा अनामत रक्कम ही करार कालावधी समाधानकारक पूर्ण केल्यानंतर परत केली जाईल.

३) ठेकेदाराने निविदा स्वीकारल्याचे पत्र दिल्यानंतर ०७ दिवसाच्या आत शासन नियमानुसार नोटरी करून देणे बंधनकारक राहील.

४) करारनामा / नोटरी नेमणुकीसाठी येणारा खर्च ठेकेदारास स्वतः करावा लागेल. सदर पूर्तता विहित मुदतीत करारनामा न केल्यास त्यानंतरच्या तारखेपासून प्रतिदिन रु. १,०००/- दंड मासिक बिलातून कपात करण्यात येईल.

**G ) निविदा बाबत सर्व साधारण सूचना –**

१. शासनाचे www.mahatenders.gov.in संस्थानचे www.shanidev.com या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध केलेल्या अटी-शर्ती वाचून निविदा भरावी.

२. सदर कामाबाबतची निविदा दि.२४.०४.२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजल्यापासून दि.०६.०५.२०२६ दुपारी २.०० वाजेपर्यंत www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर अपलोड व डाऊनलोडिंग साठी उपलब्ध राहील.

३. ई-निविदा प्रक्रियेमध्ये केवळ online सादर केलेली कागदपत्रे ग्राह्य धरणेत येतील. त्यामुळे हार्ड कॉपी (hard copy) संस्थानचे कार्यालयात जमा करणेत येणार नाहीत/स्विकारले जाणार नाही.

४.शक्य झाल्यास दि.०८.०५.२०२६ रोजी Online Technical Bid उघडण्यात येईल.तांत्रिक निविदेमध्ये पात्र ठरलेल्या निविदाधारकांच्याच Commercial Bid उघडण्यात येतील.

५. सदर Commercial Bid उघडण्याच्या दिवशी आपण किंवा आपले प्रतिनिधी उपस्थित राहता येईल. ऑनलाइन निविदा भरताना निविदाधारकांनी आपले संपर्क क्रमांक ऑनलाइन निविदेतील तपशिलात नमूद करावेत, म्हणजे पात्र ठरणाऱ्या निविदाधारकांना Commercial Bid उघडण्याची तारीख व वेळ कळविण्यात येईल.

६. निविदा अंशत:/पूर्णत: स्वीकारणे अथवा सर्व निविदा नाकारणेचा अधिकार संस्थानने राखून ठेवलेला आहे. याबाबत कारणे देणे संस्थान प्रशासनावर बंधनकारक राहणार नाही.

७. ऑनलाइन निविदा सादर केल्यानंतर निविदा प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर निविदेतून माघार घेतल्यास निविदेची संपूर्ण बयाणा रक्कम जप्त करण्यात येईल.

८. निविदा फर्मच्या / व्यक्तीच्या नावाने असेल त्याच नावाने सर्व कागदपत्रे असणे आवश्यक आहे. त्यामध्ये भिन्नता / तफावत आढळल्यास सदर निविदा नामंजूर समजून बाद ठरविण्यात येईल. त्याबद्दल निविदा धारकास तक्रार करण्याचा कोणताही अधिकार राहणार नाही.

९. कंत्राटदार / निविदा धारक यांची निविदा मंजूर झाल्यानंतर सदर कामाचा ठेका इतर उपकंत्राटदारास देता येणार नाही/नेमणूक करता येणार नाही.

१०. सदर निविदा उघडण्याच्या दिवशी आपण किंवा आपले प्रतिनिधी उपस्थित राहता येईल. अनुपस्थित राहिल्यास त्या बाबत कोणतीही तक्रार विचारात घेण्यात येणार नाही.

११. निविदा भरताना निविदा धारकांनी आपले संपर्क क्रमांक निविदा तील तपशिलात नमूद करावेत.

१२. देवस्थानचे प्रसादालयात प्रसाद/भोजन तयार करणे व वाढणे इ. कामाचा संपूर्ण तपशील दिलेला आहे. त्यानुसार सदर कामासाठी दर देताना सर्व करासहित प्रती पात्र दर द्यावेत.

१३. निविदा धारकाने निविदा मंजूर झाल्यानंतर काही कारणास्तव काम घेण्यास नकार दिल्यास / टाळाटाळ केल्यास / हलगर्जीपणा केल्यास सुरक्षा अनामत रक्कम संस्थान खात्यात जमा करून घेण्यात येईल तसेच सदर कंत्राटदारास काळ्या यादीत टाकणे किंवा संस्थान व्यवस्थापनाने घेतलेल्या निर्णयानुसार योग्य ती कारवाई करण्यात येईल.

१४. निविदा धारकाने निविदा भरण्यापूर्वी प्रत्यक्ष कामाचे स्वरूप, व्याप्ती, प्रसाद/भोजन तयार करणे व वाढणे इ. कामाचे दैनंदिन प्रमाण, उत्सव कालावधीत तयार करण्यात येणारे प्रमाण, गर्दीचे दिवस यांची सखोल माहिती करून घेऊनच निविदा सादर करावी.

**H** ) Online **निविदेतील दर व करांबाबत** –

१) निविदाधारकांनी Online BOQ (परिशिष्ट "ई") मध्ये ऑनलाईन दर भरताना GST-TDS, TDS अगर इतर कुठलाही शासकीय कर, तसेच किमान वेतन दराबाबत, उत्सव खर्च, या सर्व बाबींचा विचार करून दर नमूद करावेत.

२) शासन नियमांनुसार वेळोवेळी लागू होणारे कर यापुढे निविदाधारकास बंधनकारक राहतील व त्याप्रमाणे रक्कम बिलात कपात करण्यात येईल. शासन निर्णय दि. ०१ एप्रिल २०२५ पासून काम व वस्तू / सेवा पुरवठ्यावर २% GST-TDS लागू करण्यात येणार आहे. याबाबत अधिक माहिती महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

३) करार कालावधी संपेपर्यंत मंजूर दरामध्ये कोणतीही वाढ दिली जाणार नाही / मागता येणार नाही.

**I** ) **किमान वेतन दर**, EPF, ESIC **व कर्मचारी विमा पॉलिसीबाबत** –

१) कंत्राटदार त्यांचेकडील कुशल व अकुशल कंत्राटी कामगारांना महाराष्ट्र शासनाच्या शॉप अँड कमर्शियल इस्टॅब्लिशमेंट झोन नंबर नुसार शनिशिंगणापूर ता.नेवासा जि अहिल्यानगर करिता लागू असणारे किमान वेतन दर + विशेष भत्ता (VDA) + भविष्य निर्वाह निधी (प्रशासकीय चार्जसह) देण्यास बंधनकारक राहील. किमान वेतन दरात शासनाने वेळोवेळी केलेले बदल ठेकेदारावर बंधनकारक राहतील. याबाबत संस्थानकडून कोणतीही अतिरिक्त मागणी मान्य केली जाणार नाही.

२) कंत्राटदाराकडे कामास असलेल्या कामगारांचे कामगार कल्याण निधी,व्यवसाय कर,आयकर,टी.डी.एस.,ई.पी.एफ., ई.एस.आय.सी.,वर्कमन्स कॉम्पेन्सेशन,मातृत्व भत्ता,पगारी सुट्ट्या,पगारी रजा,बोनस,ग्रॅच्युइटी,अपघात विमा इत्यादी सर्व कायदेशीर जबाबदाऱ्या कामगार कायद्यानुसार कंत्राटदारावर बंधनकारक राहतील. संस्थान त्यासाठी कोणत्याही प्रकारे जबाबदार राहणार नाही अथवा त्याची तोशीस व इजा संस्थान प्रशासनाला लागू राहणार नाही.

३) कंत्राटदाराने कामास लावलेल्या सर्व कामगारांचे वेतन प्रत्येक महिन्याच्या १० तारखेपर्यंत किंवा त्यापूर्वी बँक खात्यामार्फत थेट कामगारांच्या खात्यात जमा करणे बंधनकारक राहील. यासाठी कंत्राटदारास संस्थानकडून बिलाची रक्कम अदा केली जाण्याची वाट पाहता येणार नाही. कंत्राटदाराने कामगारांचे वेतन १० तारखेपर्यंत न केल्यास त्यानंतरच्या विलंबासाठी दंडात्मक कारवाई करण्यात येईल. तारखेपासून प्रतीदिन प्रती कामगार किमान रुपये ५०/- मात्र इतका दंड आकारला जाईल व दंडाची रक्कम पुढील महिन्याचे देयकामधून वसूल केली जाईल.

४) सदर कामासाठी लावण्यात येणाऱ्या कंत्राटी कामगारांच्या बाबतीत कामगार नुकसान भरपाई कायदा १९२३ (Workmen Compensation Act 1923) नुसार कंत्राटी कामगारास नुकसान भरपाई देय असल्यास सदर नुकसान भरपाईची रक्कम भविष्य निर्वाह निधी अधिनियम १९५२ (Employees Provident Fund Act 1952) नुसार भरावी लागणारी अंशदान रक्कम (प्रशासकीय चार्जेससह) तसेच किमान वेतन अधिनियम १९४८ व पेमेंट ऑफ वेजेस ॲक्ट १९३६ नुसार कंत्राटी कामगारांना विहित मुदतीत वेतन अदा करणे इ. बाबींची कायदेशीर जबाबदारी ही कंत्राटदारास बंधनकारक राहील.

५)नवीन कामगार कायद्याप्रमाणे ज्या बाबी उदा.EPF/ESIC/ इ. अनिवार्य आहेत त्यानुसार पूर्तता करावी लागेल कामगार संस्थेच्या निकषानुसार व कायद्यातील कोणत्याही तरतुदीनुसार कामगारांच्या कायदेशीर देणे बाबत सुट असल्यास तशी

कागदपत्रे निविदाधारकास सादर करावी लागतील.निविदाधारकाने दर सादर करताना कामगार कायदातील तरतुदी विचारात घेऊनच दर सादर करणे बंधनकारक राहील.

६)कंत्राटदाराने कामास लावलेल्या सर्व कर्मचाऱ्यांचे भविष्य निर्वाह निधीतील (PF) हिस्सा नियमानुसार भरणे आवशक राहील व त्या बाबत चलने इतर अनुषगीक कागदपत्रे संस्थेचे आस्थापना विभागाकडे विहित मुदतीत जमा करावी लागेल. याबाबत संस्थेची दिशाभूल केल्यास कंत्राटदारास कोणतीही पूर्वसूचना न देता त्याचे कार्यकंत्राट रद्द करून सुरक्षा अनामत रक्कम जप्त करण्यात येईल व कंत्राटदारास पुढील ०३ वर्षे कालावधीकरिता संस्थेच्या काळ्या यादीत (Black List) समाविष्ट करण्यात येईल अथवा मा. व्यवस्थापन समितीने निर्णयानुसार कार्यवाही करण्यात येईल.

७)निविदाधारकाने त्यांचे द्वारा नियुक्त कर्मचारी यांना वेतन अदा केल्या बाबत व सर्व करांचे भरणा केलेची कागदपत्रांची पूर्तता केलेनंतर व त्याबाबत आवश्यक कागदपत्रे देवस्थान प्रशासन यांना सादर केले बाबत खात्री झाल्यानंतर पुढील ३० दिवसांत वेतन अदा केलेल्या कागदपत्रांची अदा न केल्यास त्याबाबत संस्था प्रशासनाची जबाबदारी कंत्राटदाराची राहील.

८) शासन नियमानुसार निविदाधारकाने त्यांचे द्वारा नियुक्त कर्मचारी यांचा अपघाती विमा उतरविणे संबंधित कंत्राटदारास बंधनकारक राहील व सदर विमा पॉलिसीची प्रत कार्यादेश मिळाल्यापासून ०१ महिन्याचे आत संस्था प्रशासनाकडे सादर करणे कंत्राटदारास बंधनकारक राहील.

९)सदर कामासाठी लावण्यात येणाऱ्या कंत्राटी कामगारांसंबंधी कंत्राटी कामगार नियम व निर्मूलन अधिनियम १९७० नुसार ठेवावे लागणारे हजेरी रजिस्टर,वेतन रजिस्टर व इतर वैधानिक स्वरूपातील सर्व रेकॉर्ड व दस्तऐवज विहित नमुन्यात ठेवण्याची व त्यासंबंधी सर्व कायदेशीर पूर्तता करण्याची जबाबदारी कंत्राटदाराची राहील.

१०)मासिक बिल सादर करताना बिलात कायदेशीर बाबीप्रमाणे संपूर्ण तपशील असणे आवश्यक राहील. संक्षिप्त स्वरूपात असलेली बिले ग्राह्य धरली जाणार नाहीत / अदा केली जाणार नाहीत

११)कंत्राटदारामार्फत पुरविलेल्या कंत्राटी कामगारांनी कोणतेही गैरकृत्य वर्तन केल्यास, संस्थेचे पिढीगत/प्रतिष्ठा/हानी पोहोचविल्यास त्याबाबतची संपूर्ण नुकसान भरपाई देण्याची जबाबदारी संबंधित कंत्राटदारावर राहील.

**J ) अन्न सुरक्षा मानके कायदा-2006 आणि नियम 2011 व ISO चे नियम –**

१. अन्न सुरक्षा मानके प्राधिकरण, महाराष्ट्र शासन यांचे नियमामध्ये वेळोवेळी होणारे बदल (फूड अँड ड्रग्स ॲडमिनिस्ट्रेशन) कंत्राटदारास बंधनकारक राहतील. कामाचे ठिकाणी धूम्रपान व मद्यपान पूर्णतः मनाई आहे याची विशेष काळजी कंत्राटदाराने घ्यावयाची आहे. कंत्राटदाराकडील कर्मचारी असे वर्तन करताना आढळून आल्यास कंत्राटदारावर प्रति कामगार १०००/- (एक हजार रुपये) दंडात्मक कारवाई करण्यात येईल.

२. सर्वच कामासाठी लावण्यात येणाऱ्या प्रत्येक कामगारांची वैद्यकीय तपासणी दर 03 महिन्यांनी संस्थेच्या रुग्णालयात निशुल्क करण्यात येईल. सदर वैद्यकीय संस्थेचे रेकॉर्ड दिलेले वैद्यकीय विभागप्रमुख यांचे पत्र घेऊन, प्रत्येक कर्मचाऱ्याची दर 03 महिन्यांनी वैद्यकीय तपासणी करून, तपासणी अहवाल सह ते वार्षिक अन्न प्रसाद निर्मिती विभागास सादर करण्याची जबाबदारी संबंधित कंत्राटदारावर राहील. संसर्गजन्य आजार किंवा त्वचारोग झालेल्या कर्मचाऱ्यांकडून सदरची कामे करून घेतली जाणार नाहीत अथवा अशा कर्मचाऱ्यांची नेमणूक करता येणार नाही.

३. अन्न सुरक्षा मानके कायदा-2006 आणि नियम 2011 व ISO चे नियमांनुसार स्त्री कामगार यांना ड्युटीचे वेळेत (स्वयंपाकघर व यासोबत जोडीत असलेल्या ठिकाणी) अंगठी, नेकलेस, बांगडी, कानातील आभूषणे तसेच एक बोटामधील अंगठी, घड्याळ, अंगठी, हातातील साखळी इ. वस्तू वापरण्यास प्रतिबंध राहील (आवश्यक आभूषण व्यतिरिक्त). पुरुष कामगारांना कामाचे ठिकाणी येताना डोक्याचे केस कापुन येणे, दाढी करणे, हाताची नखे कापणे इ. स्वच्छतेबाबतची सर्व जबाबदारी कर्मचाऱ्यावर बंधनकारक राहील. कामावर असलेल्या सर्व कर्मचाऱ्यांची वैयक्तिक स्वच्छता ठेवण्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित कर्मचारी व कंत्राटदार यांच्यावर राहील.

४. कंत्राटदाराकडील कंत्राटी कामगारांना गॉगल्स,ॲप्रन,चपला/गमबूट,एप्रन,टोपी,मास्क इ. कंत्राटदारास स्व-खर्चाने पुरवावे लागतील व त्यांचा वापर करण्याची जबाबदारी संबंधित कंत्राटदारावर राहील.

**K ) कार्य कंत्राट रद्द करणे / कायदेशीर टाकणे व दंडात्मक कारवाईबाबत तरतूद –**

१. प्रसादालय/भोजन विभागप्रमुख अगर कार्यालयातील कर्मचारी यांचे सुचनेप्रमाणे मालाचे परिमाण वापरून आवश्यकतेनुसार जेवण तयार करून वाढणे इ.काम करावे लागेल. याबाबत कोणत्याही प्रकारचा वाद उपस्थित होणार नाही अशाप्रकारे आपलेकडील कर्मचाऱ्यांचे वर्तन असणे आवश्यक असून वरिष्ठांसोबत उद्धटपणे, अर्वाच्च भाषेत बोलणे अगर वाद उद्भवल्यास सर्वस्वी कंत्राटदारास जबाबदार धरून प्रशासनाकडून योग्य ती दंडात्मक कारवाई करणे अथवा कंत्राट रद्द करण्याचा अधिकार संस्थान प्रशासनास राहील.

२. कंत्राटदाराचे कामाची प्रत (गुणवत्ता) समाधानकारक नसल्याचे आढळून आल्यास किंवा जेवण तयार करणे व वाढणे,स्वच्छता इ. काम संस्थांचे मागणी प्रमाणे न झाल्यास संस्थानची अडचण होऊ नये म्हणून इतर कंत्राटदाराकडून बाजारभावाने आवश्यक तेवढे काम करून घेतल्यास त्यासाठीच्या जादा लागलेल्या फरकाची खर्ची झालेली रक्कम सुरक्षा अनामत रक्कमेतून किंवा पुढील देयकातून कपात करण्यात येईल.

३. निविदेतील, करारनाम्यातील व कार्यादेशातील सर्व अटी-शर्तींचे पालन करणे निविदा धारकांवर बंधनकारक राहील. निविदेतील,करारनाम्यातील व कार्यादेशातील एक किंवा अनेक अटी-शर्ती उल्लंघन झाल्यास, कंत्राटदाराचे कार्यकंत्राट रद्द करून, संपूर्ण सुरक्षा अनामत रक्कम जप्त करण्यात येईल व कंत्राटदारास पुढील ०३ वर्षे कालावधीकरिता काळ्या यादीत (Black List) समाविष्ट करण्याची कार्यवाही करण्यात येईल.

**L ) बिल अदा करण्याची पद्धत –**

१) प्रसादालयात जेवण तयार करणे व वाढणे साफसफाई ठेवणे इ.कामाची तपासणी करून, त्याचा दर्जा व प्रमाण योग्य असल्याची खात्री झाल्यानंतरच बिल अदा करण्यात येईल.

२) प्रति पात्र मजुरी दराने, मजुरीचे मासिक बिल संस्थानकडे सादर केल्यापासून ३० दिवसांचे आत संबंधित कंत्राटदाराचे बँक खात्यावर अदा करण्याचा प्रयत्न राहील.

3) शासन नियमानुसार आवश्यक असलेले सर्व कर / कपाती बिलातून वसूल करण्यात येतील.

**M ) कामासंबंधीत सर्व साधारण अटी – शर्ती**

१) कंत्राटदारामार्फत काम करु इच्छिणारे कंत्राटी कर्मचारी भाविक वृत्तीचे असावेत. संस्थान कर्मचारी/अधिकारी व भाविकांशी उद्धट, बेशिस्त, व गैरशिस्त वर्तन करणाऱ्या कंत्राटी कर्मचाऱ्यांना तात्काळ विनानोटीस / विनानुकसान भरपाई कामावरून बंद करण्याची जबाबदारी संबंधित कंत्राटदाराची राहील.तथापि,कामगारांकडून उद्धट,बेशिस्त,व गैरशिस्त वर्तन असे प्रकार कामाचे ठिकाणी वारंवार घडत असल्यास विना नोटीस कंत्राटदाराचे कार्य कंत्राट रद्द करण्याचा अधिकार संस्थान प्रशासनास राहील.

२) संस्थानकडे काम सुरू केल्यानंतर या ठिकाणी काम करून घेण्यासाठी आवश्यक वैध लेबर लायसन्सची प्रत व अहिल्यानगर जिल्ह्यात काम करत असल्याबाबत कामगार आयुक्त - अहिल्यानगर यांचे पत्राची प्रत (Form 5A) नियत मुदत झाल्यानंतर ३० दिवसात संस्थान प्रशासनास सादर करणे कंत्राटदारास बंधनकारक राहील.

३) कर्मचाऱ्यांच्या वैयक्तिक स्वच्छतेकडे (जसे -केस कापणे,दाढी,नखे,शारीरिक इजा / दुखापत,त्वचेचे आजार,स्वच्छ गणवेश इ.) लक्ष ठेवण्याची जबाबदारी कंत्राटदाराची राहील व त्यासाठी स्वतंत्र रजिस्टरमध्ये दैनंदिन नोंदी ठेवणे व विभागप्रमुख / अधिकारी मागणी करतील त्यावेळी सादर करणे बंधनकारक राहील.

४) कर्मचाऱ्यांना गणवेश, ओळखपत्र व ड्युटी कार्ड देणे प्रसादालय कक्षात वापरायचे चप्पल / गमबूट, एप्रन, टोपी, मास्क, हातमोजे इ. साहित्य ०१ महिन्यांचे आत स्व-खर्चाने पुरवण्याची जबाबदारी कंत्राटदाराची राहील. तसे न केल्यास प्रतिमहिना प्रति कर्मचारी रु.१,०००/- दंड मासिक बिलातून कपात / वसूल करण्यात येईल.

५) संस्थेच्या प्रशासनाकडून प्रसाद /भोजन दर्जा व गुणवत्तेबाबत सुचविण्यात येणारे बदल / सूचनांनुसार व संस्थेच्या मागणीनुसार प्रसाद भोजन तयार करून देणे,भाविकांना वाढविणे इ. काम करणे आवश्यक राहील. त्यासाठी ठेकेदाराने दरपत्रकात दिलेल्या न्यूनतम दराव्यतिरिक्त कुठलीही दरवाढीची मागणी करता येणार नाही.

६) सदर काम प्रति पात्र मजुरी पद्धतीचे असल्याने कंत्राटदाराकडून कामास लावनेत आलेले कुशल व अकुशल कामगारांची नेमणूक करणे,त्यांची सेवा समाप्त करणे,कामगारांवर नियंत्रण व देखरेख (पर्यवेक्षण) करण्याची नियमांनुसार कार्यदेशीर जबाबदारी कंत्राटदारावर राहील.

७) कंत्राटामार्फत कामास असलेले त्यांचे सेवक संस्थान सेवेकरीता आग्रह धरू शकणार नाहीत / पात्र असणार नाहीत. तसेच कंत्राटदाराने लावलेल्या कामगारांचा संस्थांनशी कोणत्याही प्रकारे मालक-नोकर असा कायदेशीर संबंध राहणार नाही अथवा प्रस्थापित होणार नाही. सदर कर्मचारी हे एजन्सीचे कर्मचारी राहतील. कंत्राटदार व त्यांचे कामगार यांच्यात काही वाद-विवाद उपस्थित झाल्यास तो सोडविण्याची संपूर्ण जबाबदारी कंत्राटदारावर राहील. त्याची तोशीश अथवा झळ संस्थान प्रशासनाला लागणार नाही याची खबरदारी कंत्राटदारावर बंधनकारक राहील.

८) कार्यकंत्राटाचा कालावधी संपलेनंतर पुढील कालावधी करिता नवीन ठेकेदाराची निवड करनेकामी / निविदा प्रक्रियेचे कार्यवाहीसाठी अवधी लागत असल्यास व सदर कालावधीसाठी संस्थेने मुदतवाढ दिल्यास,आहे त्याच पूर्वीच्या मंजूर दराने नवीन ठेकेदाराची नियुक्ती होई पावेतो कंत्राटदारास काम करावे लागेल. याबाबत कोणतीही दरवाढ दिली जाणार नाही / मागणी करता येणार नाही.

९) कंत्राटदारास कोणत्याही कारणासाठी आगाऊ (अॅडव्हान्स) रकमेची मागणी करता येणार नाही.

१०) सदर कार्यकंत्राट / व्यवहारा बाबत काही वाद-विवाद उपस्थित झाल्यास,ज्यू सिव्हील डिव्हीजन नेवासा कोर्टाचे न्याय कक्षेत राहील.

११) प्रसाद/भोजना बाबत शनी भक्तांचे मनात प्रचंड श्रद्धा असून प्रसादाचे धार्मिक महत्व आहे त्या मुळे तो बनविताना शनिदेवाचे मनोभावे स्मरण करून बनविणे आवश्यक आहे. त्यामुळे निविदाधारकाने व त्यांचे कडील काम करणाऱ्या सर्व कर्मचाऱ्यांनी शनीदेवावर भक्तीसह प्रसादाचे पावित्र्य राखणे आवश्यक असेल. तसेच निविदाधारकाने व त्यांचे कडील काम करणाऱ्या सर्व कर्मचाऱ्यांची शनिदेवा विषयी आस्था,श्रद्धा असणे आवश्यक असून प्रसादालयातील शनिदेवाच्या फोटो चे दररोज पूजन करणे व त्याचे पावित्र्य ठेवणे आवश्यक असेल. पात्र निविदा धारकास या बाबतचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

१२) निविदेतील अटी-शर्तींनुसार विविध दंडात्मक कारवाई नमूद करण्यात आलेली असून त्या व्यतिरिक्त बाबी करिता खालील प्रमाणे कारवाई करण्यात येईल.

| अ.क्र. | बाब | कारवाई |
|---|---|---|
| | चव खराब असणे | १.प्रथम वेळी समज देण्यात येईल<br>२.एकाच महिन्यात एका पेक्षा अधिक मात्र तीन पेक्षा जास्त नाही एवढे वेळेस सदरील बाब निदर्शनास आल्यास तीन दिवसांचे पूर्ण देय रक्कम कपात करण्यात येईल<br>३. एकाच महिन्यात तीन पेक्षा जास्त सदरील बाब घडल्यास नमूद २ मधील शिक्षा व खुलासा ऐकून घेऊन निविदा रद्द करण्याची कारवाई करण्यात येईल |
| | स्वच्छता न ठेवणे | १.प्रथम वेळी समज देण्यात येईल<br>२.एकाच महिन्यात एका पेक्षा अधिक मात्र तीन पेक्षा जास्त नाही एवढे वेळेस सदरील बाब निदर्शनास आल्यास तीन दिवसांचे पूर्ण देय रक्कम कपात करण्यात येईल<br>३. एकाच महिन्यात तीन पेक्षा जास्त सदरील बाब घडल्यास नमूद |

| | | |
|---|---|---|
| | | २ मधील शिक्षा व खुलासा ऐकून घेऊन निविदा रद्द करण्याची कारवाई करण्यात येईल |
| | अन्नाची नासाडी करणे | १.जेवढ्या अन्न पात्रांची नासाडी झाली आहे त्या बाबत प्रति पात्र रु.५०/- प्रमाणे दंड वसूल करण्यात येईल. |
| | सूचित केले प्रमाणे (मेनू नुसार) भोजन तयार न करणे | १.त्या संपूर्ण दिवसाची देय रक्कम वसूल करण्यात येईल.<br>२.एकाच महिन्यात तीन पेक्षा जास्त सदरील बाब घडल्यास नमूद १ मधील शिक्षा व खुलासा ऐकून घेऊन निविदा रद्द करण्याची कारवाई करण्यात येईल |

१३) सशर्त निविदा तत्काळ रद्द करण्यात येतील. सदर निविदेतील नमूद अटी-शर्ती व अर्हता पूर्ण करू न शकलेल्या निविदा धारकांच्या निविदा रद्द करण्यात येतील.

१४) कर्मचारी भविष्य निर्वाह निधी अधिनियम - ESIC योजनेबाबत करावयाची पूर्तता -

आपण कामाकरिता नेमलेल्या कामगारांचे पगारपत्रकानुसार होणारी भविष्य निर्वाह निधीची रक्कम तसेच ESIC योजनेची रक्कम दरमहा वेळेत भरणे व आवश्यक कागदपत्रे कर्मचारी भविष्य निर्वाह निधी कार्यालयाकडे जमा करणे ही निविदा धारकाची जबाबदारी आहे.

**निविदाधारक यांनी खालीलप्रमाणे कागदपत्रे सादर करणे बंधनकारक राहतील.**

१) कामाचे सुरुवातीस कंत्राटी कामगार (नियम व निर्मूलन) अधिनियम १९७० चे नियम २१(२) नुसार मा. सहायक कामगार आयुक्त, अहिल्यानगर यांचेकडून या कामाकरिता घेतलेला लेबर लायसेन्स ची प्रत अथवा त्याबाबतचे प्रतिज्ञापत्र सादर करणे बंधनकारक राहील. कामगारांची संख्या वाढल्यास त्याप्रमाणे सुधारित लायसन्स सादर करावे लागेल.

२) आपण सदर कामाकरिता नेमलेल्या कर्मचाऱ्यांचे भविष्य निर्वाह निधी कार्यालयातील विहित नमुन्यातील नोंदणी फॉर्म भरून देणे व सदर फॉर्म भविष्य निर्वाह निधी कार्यालयात जमा करण्याची जबाबदारी आपली राहील.

३) दरमहा रक्कम भरणा केल्यानंतर चलनाची एक मूळ प्रत, ऑनलाईन प्रिंट रजिस्टर, रक्कम जमा केलेली रिसीट स्लिप, हजेरी पत्रक व पगार पत्रक इत्यादी कागदपत्रांच्या प्रमाणित प्रती (प्रत्येक महिन्याची स्वतंत्रपणे) संबंधित विभागास सादर कराव्यात.

४) आपणास प्रसाद/भोजन विभागात काम दिलेले असल्याने त्याच्या अहवालानुसार कामाचा कालावधी निश्चित करण्यात येईल व त्या कालावधीची उपरोक्त कागदपत्रे सादर करणे आवश्यक आहे.

५) प्रत्येक महिन्याचे बील मागील महिन्यातील भविष्य निर्वाह निधीची रक्कम भरल्यानंतरच अदा करण्यात येईल. सदरची रक्कम भरणा करून कागदपत्रे सादर केल्याशिवाय पी.एफ. विभागास अभिप्राय देता येत नाही. त्यामुळे कागदपत्रे वेळेत सादर न केल्यास आपले बील वेळेत अदा होणार नाही.

६) उपरोक्तप्रमाणे आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करण्यात कंत्राटदारास विलंब झाल्यास, सदर कामाचे बील प्रलंबित राहील व त्याची सर्वस्वी जबाबदारी कंत्राटदाराची राहील.

७) संस्थानकडील कंत्राट संपल्यानंतर आपल्याकडील कामगारांची भविष्य निर्वाह निधीची रक्कम त्यांना परत मिळवून देणे संबधी कार्यवाही करण्याची सर्व जबाबदारी कंत्राटदाराची राहील.

८) कंत्राटदाराने कामावर लावलेल्या सर्व कर्मचाऱ्यांचे राज्य विमा निगम (ESIC) योजनेबाबत रजिस्ट्रेशन करून, कंत्राटी कर्मचारी हिस्सा ०.७५% व मालकाचा हिस्सा ३.२५% कामगारांच्या खात्यावर भरणा करणे व आवश्यक कागदपत्रांची तपशीलवार माहितीची पूर्तता करून देणे, इ. कंत्राटदारास बंधनकारक राहील.

१५) उपरोक्त अटी-शर्तींत काही बदल सुधारणा करणे अथवा जादा अटी-शर्ती विहित करण्याचा अधिकार संस्था प्रशासनाने राखून ठेवलेला आहे. निविदा धारकांच्या कोणतीही अट/अटी संस्थानवर बंधनकारक राहणार नाही. असे निविदा विचारात घेतले जाणार नाहीत.

अतुल चोरमारे
कार्यकारी अधिकारी
श्री शनैश्वर देवस्थान शिंगणापूर तथा
विशेष भूसंपादन अधिकारी क्र.१, अहिल्यानगर

**परिशिष्ट - “अ”**

**श्री शनैश्वर देवस्थान करिता प्रसाद/भोजन बनविणे बाबत**
**ई निविदे साठी तांत्रिक (Technical) कागदपत्रे**

| | |
|---|---|
| १) अन्न औषध प्रशासन यांचा चालू वर्षाचा वैध केटरिंग,रेस्टॉरंट किंवा तत्सम परवाना. | |
| २) वैध लेबर लायसन्सची प्रमाणित प्रत. | |
| | |
| ३) पॅन कार्डची प्रमाणित प्रत. | |
| ४) जी.एस.टी. (GST) प्रमाणपत्राची प्रमाणित प्रत. | |
| ५) कर्मचारी भविष्य निर्वाह निधी (Provident Fund) प्रमाणपत्राची प्रमाणित प्रत. | |
| ६) ESIC प्रमाणपत्राची प्रमाणित प्रत. | |
| ७) कोणत्याही संस्था / शासकीय / निमशासकीय / खाजगी संस्था यांच्या काळ्या यादीमध्ये समाविष्ट नसल्याचे लेखी प्रतिज्ञापत्र. | |
| ८) शॉप अॅक्ट परवाना | |

**निविदा धारकाचे नाव व स्वाक्षरी**

**शिक्का**

## परिशिष्ट - “ब”

## निविदाधारका बाबतची माहिती

१. फर्मचे/संस्थेचे नाव --------------------------------------------------------------------------

२. पत्रव्यवरासाठी संपूर्ण पत्ता-----------------------------------------------------------------

3. दूरध्वनी क्रमांक-------------------------------------------------------------

कार्यालय------------------------------------------------

निवास-----------------------------------------------

फॅक्स नंबर---------------------------------------------

ई-मेल------------------------------------------------------

४. संपर्क साठी व्यक्तीचे नाव-------------------------------------------------------------

दूरध्वनी क्रमांक ------------------------------------------------------------------

५. मालकाचे /भागीदारांची नावे १ -------------------------------------------------------

२.----------------------------------------------------------

६. RTGS Details

१. बँक खाते नंबर ---------------------------------------------------

२. बँकेचे नाव-------------------------------------------------------

3. शाखा ------------------------------------------------------------

४.आयएफसी कोड-------------------------------------------------

५. एम आय सी आर कोड -------------------------------------------

**निविदा धारकाचे नाव व स्वाक्षरी**

**शिक्का**

**<u>परिशिष्ट - “क”</u>**

**श्री शनैश्वर देवस्थान विश्वस्तव्यवस्था (शिंगणापूर) यांना निविदा धारकाने द्यावयाचे बंधपत्र**

---

दिनांक : ___

प्रति,
मा. कार्यकारी अधिकारी,
श्री शनैश्वर देवस्थान विश्वस्तव्यवस्था (शिंगणापूर),
ता. नेवासा , जि. अहिल्यानगर

विषय : श्री शनैश्वर संस्थानचे प्रसादालय/भोजनालय विभागाकरिता ( एप्रिल २०२६ ते मार्च २०२९ अखेर ) श्री शनैश्वर संस्थानचे प्रसादालय/भोजनालय विभागासाठी प्रति पात्र मजुरी दराने प्रसाद/भोजन स्वयंपाक तयार करणे व वाढणे इ. तत्सम कामाचे निविदा बाबत.

महोदय,

मी / आम्ही खालीलप्रमाणे सही करून लिहून देतो / देतो की, वरील विषयासंबंधी आपण प्रसिद्ध केलेल्या निविदेतील सर्व अटी व शर्ती मी / आम्ही वाचलेल्या असून त्या मला / आम्हाला पूर्णतः मान्य आहेत. आपले अटी व शर्ती पालन करावयाचे मी / आम्ही मान्य करीत आहे/आहोत.

मी / आम्ही आपणास निविदेत नमूद केले प्रमाणे प्रसादालयात संस्थान द्वारा वेळोवेळी बदल करण्यात येणाऱ्या रेसिपीज नुसार उपरोक्त कालावधीत संस्थांन प्रशासनाचे आवश्यकतेनुसार कोणतीही कारणे न देता श्री शनैश्वर संस्थान शिंगणापूर प्रसादालय विभाग यांना स्वयंपाक तयार करून भाविकांना वाढण्याचे व साफसफाई इ. काम करून देण्याची हमी देतो .

माझी/आमची सादर केलेली प्रति पात्र दराची निविदा मंजूर झाल्यास एक महिन्याचे आत योग्य त्या रकमेच्या स्टॅम्प पेपरवर करारनामा करून देऊ व निविदा कामाच्या एकूण मूल्याच्या रु.२,००,०००/- ( दोन लाख रुपये ) सुरक्षा अनामत पुर्नाकीत रकमेचा भरणा विना व्याजी संस्थांच्या अधिकृत खात्यात अथवा डीडी स्वरूपात जमा करू विषयांकित काम एप्रिल २०२६ ते मार्च २०२९ पर्यंत मंजूर प्रति पात्र दराने करून देणे माझेवर/ आमच्यावर बंधनकारक राहील त्यात कसूर झाल्यास होणाऱ्या शिक्षेस मी/ आम्ही पात्र राहू असे बंधपत्र देत आहे/ आहोत.

आपला/ आपली विश्वासू

फर्म मालक/ भागीदाराचे नावे — सही व शिक्का.

(१)

(२)

**परिशिष्ट - "ड"**

**<u>वार्षिक उलाढाल प्रमाणपत्र</u>**

( अधिकृत सनदी लेखापाल यांचे सत्यापन )

दाखला देण्यात येतो  कि, मे ..........................................................................................................................................

यांचे निविदे संबधीत व्यवसायाची सन २०२२-२०२३,२०२३-२०२४ व २०२४-२०२५ या आर्थिक वर्षात वार्षिक उलाढाल खालील प्रमाणे आहे.

| अ.नं. | वर्ष | वार्षिक उलाढाल (रुपयात ) |
|---|---|---|
| १ | सन २०२२-२०२३ | |
| २ | सन २०२३-२०२४ | |
| ३ | सन २०२४-२०२५ | |
| सरासरी वार्षिक उलाढाल | | |

दि.: __ /__ /२०२६

ठिकाण :..................

सनदी लेखापाल

(नाव/सही व शिक्का )

नोंदणी क्रमांक :__________

UDIN NO:-

**परिशिष्ट - "इ"**

**श्री शनैश्वर देवस्थान विश्वस्तव्यवस्था (शिंगणापूर) यांना निविदा धारकाने द्यावयाचे प्रमाणपत्र**

---

दिनांक : ___

प्रति,
मा. कार्यकारी अधिकारी,
श्री शनैश्वर देवस्थान विश्वस्तव्यवस्था (शिंगणापूर),
ता. नेवासा , जि. अहिल्यानगर

विषय : श्री शनैश्वर संस्थानचे प्रसादालय/भोजनालय विभागाकरिता ( एप्रिल २०२६ ते मार्च २०२९ अखेर ) श्री शनैश्वर संस्थानचे प्रसादालय/भोजनालय विभागासाठी प्रति पात्र मजुरी दराने प्रसाद/भोजन स्वयंपाक तयार करणे व वाढणे इ. तत्सम कामाचे निविदा बाबत अनुभव प्रमाणपत्र सादर करणे बाबत.

महोदय,

मी / आम्ही खालीलप्रमाणे सही करून लिहून देतो / देतो की, वरील विषयासंबंधी आपण प्रसिद्ध केलेल्या निविदेतील सर्व अटी व शर्ती मी / आम्ही वाचलेल्या असून त्या मला / आम्हाला पूर्णतः मान्य आहेत. आपले अटी व शर्ती पालन करावयाचे मी / आम्ही मान्य करीत आहे/आहोत.

मी / आम्ही आपणास निविदेत नमूद केले प्रमाणे मला/आम्हाला ................... एवढे वर्षाचा व निविदेत नमूद अट C मधील क्र.११ प्रमाणे मागील ५ वर्षातील खालील प्रमाणे अनुभव आहे.

- एकूण निविदा रकमेच्या म्हणजेच ४० लक्ष च्या ८० टक्के म्हणजे ३२ लक्ष रु चे एक काम
- एकूण निविदा रकमेच्या म्हणजेच ४० लक्ष च्या ५० टक्के म्हणजे २० लक्ष रु चे दोन काम
- एकूण निविदा रकमेच्या म्हणजेच ४० लक्ष च्या ४० टक्के म्हणजे १६ लक्ष रु चे तीन काम

वरील माहिती खरी असून सदरील माहिती माझेवर/ आमच्यावर बंधनकारक असून माहिती खोटी ठरल्यास होणाऱ्या शिक्षेस मी/ आम्ही पात्र राहू असे प्रमाणपत्र देत आहे/ आहोत.

आपला/ आपली विश्वासू

फर्म मालक/ भागीदाराचे नावे सही व शिक्का.

(१)

(२)

**परिशिष्ट " ई "**

**श्री शनैश्वर देवस्थान करिता प्रसादालयात प्रसाद/भोजन स्वयंपाक तयार करून, भाविकांना वाढण्याचे व तत्सम कामे प्रति पात्र मजुरी दराने करणे करिता भरून द्यावयाचे दरपत्रक**

**कंत्राटाचा कालावधी - एप्रिल २०२६ ते मार्च २०२९**

| अ.क्र | कामाचा तपशील | एप्रिल २०२६ ते मार्च २०२९ या ३ वर्षा करिता प्रति पात्र मजुरी दराने मूल्य ( सर्व करासहित रु.) |
|---|---|---|
| १ | श्री शनैश्वर संस्थानचे प्रसादालयामध्ये प्रसाद/भोजन स्वयंपाक तयार करून, भाविकांना वाढण्याचे व तत्सम कामे प्रति पात्र मजुरी दराने करणे करिता. (कालावधी एप्रिल २०२६ ते मार्च २०२९). | प्रति पात्र मजुरी दर रु. |

**निविदा धारकाचे नाव व स्वाक्षरी**

**शिक्का**

**परिशिष्ट - "उ"**

**प्रसादालयात स्वयंपाक बनविणेसाठी उपलब्ध उपकरणे**

प्रसादालयात स्वयंपाक बनविणेसाठी खालील उपकरणे सुस्थितीत आहेत.

१) सुसज्ज प्रसादालय ईमारत
२) बैठक व्यवस्था - एक वेळ ५०० भक्तांची
३) सुसज्ज किचन रूम
४) वाटर फिल्टर -२ नग
५) स्टीम कुकर -२ नग
६) प्रेशर कुकर -१ नग
७) ॲटो कढई -१ नग
८) कोल्ड रूम -१
९) फ्रीज -१ नग
१०) भाजी कटिंग मशीन -२ नग
११) पीठ मळणी मशीन -२ नग
१२) उंडा कटिंग मशीन -२ नग
१३) चपाती मेकिंग मशीन -२ नग
१४) बटाटा क्लेनिंग मशीन -१
१५) ग्राईडर मशीन -१
१६) डिश वॉश मशीन -१
१७) गॅस शेगडी - ३
१८) या व्यतिरिक्त देवस्थानकडे भोजन व्यवस्थेसाठी असलेले इतर साहित्याची यादी प्रसादालयात साईटवर उपलब्ध आहे. त्या बाबत माहिती घेऊन निविदा अर्ज भरावा.

वर नमूद केलेल्या प्रसादालयातील वापरासाठी दिलेल्या सर्व वस्तू निविदा कालावधी पूर्ण झाल्यानंतर सुव्यवस्थित देवस्थानच्या ताब्यात देण्याची जबाबदारी मंजूर निविदा धारकाची राहील. वस्तूचे नुकसान झाल्यास नुकसान भरपाई म्हणून नवीन वस्तूच्या मुल्याएवढी नुकसान भरपाई मंजूर निविदा धारकाकडून बिलातून वसूल करण्यात येईल. वर नमूद केलेल्या उपकरणे/मशीन याव्यतिरिक्त लागणारी उपकरणे/मशीन कंत्राटदारास स्वतः स्वखर्चाने आणणे बंधनकारक राहील.